नि.फौ.ख.क्र.०६/२०२५
निशाणी ०९

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नाव – ललितकुमार देवानंद येरागी
वय सुमारे – २८ वर्षे, व्यवसाय–मासेमारी
निवासस्थान–खवणे, ता. वेंगुर्ला, जिल्हा– सिंधुदुर्ग.

**<u>सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती ए.ए.पवार यांच्या मार्फत सुरु–</u>**

०१. मी मासेमारीचा व्यवसाय करतो. आरोपी हा माझ्या घराच्या शेजारी राहतो. माझ्या व आरोपीमध्ये शाब्दीक वाद झाला होता. या व्यतिरिक्त काय झाले होते हे आजरोजी मला आठवत नाही. पोलीसांनी माझा उपजिल्हा रुग्णालय ओरोस येथे जबाब नोंदविला होता. (साक्षीदाराला दि. १८/०१/२०२५ रोजीचा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला.) सदर फिर्यादी जबाबामधील मजकूर मला माहीत नाही. त्यावर माझी सही आहे. **(सहीस निशाणी– पी–१/पीडब्ल्यू१ देण्यात येते.) (सदर कागदातील मजकूर शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर राहील.)**

**सदर साक्षीदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसलेने त्यास सरकारी वकीलांनी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली ती त्यांना देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे आहे की मी सन २०२५ मध्ये मासेमारी सोबत कपडे विक्रीचा देखील व्यवसाय करीत होतो. हे म्हणणे खरे आहे की मी कपडे गोव्यावरुन मागवित असे व त्याचे पार्सल कुडाळ याठिकाणी येत असे. हे म्हणणे खरे आहे की मी आरोपीसोबत कुडाळ येथे कपडे आणण्याकरीता मोटारसायकलने गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की मी कुडाळ येथील पार्सल घेवून येतेवेळी दारुच्या बाटल्या घेतल्या व कुडाळ एम.आय.डी.सी. येथे जावून दारु प्यालो. हे म्हणणे खरे आहे की मी त्यानंतर खवणे येथील मारुती मंदिर येथे आलो. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर मी त्याठिकाणी थांबलो व आरोपी हा पार्सल घेवून पुढे गेला. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर आरोपी माझ्याजवळ आला व आम्ही दोघे खवणे येथील खालचे मारुती मंदिर येथे थांबलो. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी हनुमंत लोणे त्याठिकाणी आला. हे म्हणणे खरे नाही की आरोपी याने लोणे यांचा मोबाईल काढून घेतल्यामुळे आमच्यामध्ये वाद झाला. हे म्हणणे खरे

नाही की त्यावेळी आरोपी याने लोखंडी शिगेने मला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपी हा माझ्यामागून घरी आला व त्याने आमच्या घराच्या अंगणात देखील मला लोखंडी शिगेने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी माझे चुलत भाऊ काका व काकी यांनी भांडणे सोडविली. हे म्हणणे खरे नाही की मला मारहाण झाल्यामुळे मी उपजिल्हा रुग्णालय ओरोस येथे उपचार घेत असताना माझा जबाब नोंदविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व माझ्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्याकरीता मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.एस.जी.ठाकूर यांचेमार्फत सुरु–**

०३. हे म्हणणे खरे आहे की माझे व माझ्या काका–काकी यांचे संबंध चांगले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की मी समुद्रातून खडकावर पडल्यामुळे माझ्या मणक्यास मार लागला होता. हे म्हणणे खरे आहे की मला वेळोवेळी मणक्याच्या आजाराकरीता उपचार घ्यावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की माझी आजरोजी आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीच्या हिताविरोध माझ्या सरतपासात सांगितलेला मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

दिनांक– ०५/०८/२०२६